भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५२५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०७/२०१७

१)संगनमत करून क्रिकेटच्या पैशाच्या वादावरून लोखंडी रॉडने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक २१/०७/२०१७ चे २३.०० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करून क्रिकेटच्या पैशाच्या वादावरून फिर्यादी सोबत शिवीगाळ व भांडण करून आरोपी क्र. ०३ ने लोंखडी रॉडने फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी वैभव पुरूषोत्तम जगनाडे वय २५ वर्ष रा. मकरधोकडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाहादुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

२) संगनमत करून अनाधिकृत प्रवेश करून शिवीगाळ व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २१/०७/२०१७ चे २३.३० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे घरासमोरील किराणा दुकानातील लोखंडी बेन्च फेकफाक करून फिर्यादीचे घराचे छपरीत अनाधीकृत प्रवेश करून दरावाजा ठोकुन फिर्यादीचा मुलगा बाळु यास 'घराबाहेर निघ तुला खतम करायचे आहे' अशी धमकी देवुन शिवीगाळ केल्याने फिर्यादी देवराम सखराम जगनाडे वय ६० वर्ष रा. मकरधोकडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४४८,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाहादुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

३) रॉग साईडने वाहन चालवुन मोटार सायकलला धडक मारून दोन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २२/०७/२०१२ चे ००.०५ वा. दर. यातील जखमी योगेश मनोहर मोहतुरे वय २८ वर्ष रा. मोहाडी हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे ३८३४ ने वरठी कडे जात असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन रॉग साईडने भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन जखमीचे मोटार सायकलला धडक मारून जखमी करण्यास तसेच स्वत:चे गाडी वरील वाहक महेश राजकुमार पंचबुधे वय २४ वर्ष रा. गुंथारा यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. उबाळे याचे रपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

४)पैशाच्या कारणावरून इसमास शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २२/०७/२०१२ चे १५.३० वा. दर. यातील फिर्यादी विजय लक्ष्मण भुरे वय ५३ वर्ष रा. ग्रमीण वाचनालय अभियंता कॉलोनी भंडारा हा त्याचे घरी हजर असतांना यातील आरोपीने 'तु माझे १०,००/रू सल्लागार म्हणुन घेतलास परंतु माझा काम केलास नाही ' त्यामुळे माझी नौकरी गेली व माझी पत्नी घटस्पोर्ट मागीत आहे या कारणा वरून फिर्यादीचे घरात प्रवेश करून शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली व मोबाईलला चप्पल मारून मोबाईल खाली पाडल्याने फिर्यादीचे रपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५२,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) निष्काळजीपने वाहन चालवुन मोटार सायकलला धडक मारून इसमास जखमी केल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २२/०७/२०१७ चे १६.०० वा. दर. यातील जखमी मिथुन शिवचरण खोब्रागडे वय ३३ वर्ष रा. चांदोरी हा त्याची ऍक्टीव्हा मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु ०६१४ ने नागपुर वरून भंडारा कडे येत असता यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मागेहुन जखमीचे मोटार सायकलला धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने तसेच अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी नतिश रामदास वैदय वय ३५ वर्ष रा. गणेश वार्ड शहापुर यांचे रपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३८ भादंवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**६) जुण्या भांडणा वरून संगनमत करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून महिलेला जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २१/०७/२०१७ चे २३.३० ते २२/०७/१७ चे ०८.०० वा. दर.यातील फिर्यादी ही तिचे घरी हजर असतांनी यातील आरोपीतांनी जुने भांडणा वरून संगनमत करून फिर्यादीचे घरासमोर रोडवर सार्वजनिक ठिकानी येवुन आरोपी क्र.०१ ने फिर्यादीस पाहुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व आरोपी क्र. २ व तिन यांनी शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ५०९,२९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**७) विद्युत करंट लागुन औषध उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २२/०७/२०१७ चे १२.०० वा. दर. यातील फिर्यादी पवन प्रकाश खंडाईत वय १९ वर्ष रा. झाडगाव व मृतक रोषन तुळसीराम खंडाईत वय ४२ वर्ष रा. झाडगाव हे आप–आपले शेतावर मोटार पंप लावीत असतांना विद्युत करंट लागल्याने तो बेशुध्द अवस्थेत पडला दिसल्याने त्यास औषध उपचाराकरीता प्राथमीक आरोग्य केद्र साकोली येथे नेले असता तेथील डॉ. ने तपासुन उपजिल्हा रूग्नालय साकोली येथे रेफर केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**८) अवैध दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक २२/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, मोहाडी, कारधा व अडयाळ येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून २६ लिटर हा.भ. दारू + २०० किलो सडवा + साहीत्य किंमती १५,७५०/–रु. तसेच १लिटर ८० मिली देशी दारू किंमती ३००/–रु. असा एकुण किंमती १६,०५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २२/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०७ तीन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १२० केसेस करण्यात आलेल्या आहेत

(ऐ.टी. सुनगार)
स.पो.निरीक्षक
नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९८२३१२३३३६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.